श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते जुलै, २०१९ करीता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: श्राबायो -२०१९/प्र क्र.४६/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १४ मे, २०१९.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२/कोषा-प्रशा ५, दि.१२.०२.२०१९.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९.
४. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक बीयुडी २०१९/प्र.क्र.६/कार्यासन-६, दिनांक ०९ मे, २०१९.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता **अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी** श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये १११,३४,००,०००/- (रुपये एकशे अकरा कोटी चौतीस लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रक व आदिवासी विकास विभागाचे संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेसाठी एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी लेखानुदानाद्वारे मंजूर केलेली रक्कम रुपये ३७,११,३३,०००/- (रुपये सदुतीस कोटी अकरा लक्ष तेहतीस हजार फक्त) वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, (०२) जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजनांतर्गत योजना (ओटीएसपी), (०२) (०४) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (कार्यक्रम), ५०-इतर खर्च, (२२३५ सी १७२) " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रक व संदर्भ क्र.४ येथील आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात

देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अर्थसं २०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार व आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीयुडी २०१९/प्र.क्र.६/कार्यासन-६, दिनांक ०९.०५.२०१९ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०५१६१२२३१८५१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Wagh

Digitally signed by Prashant Pundlik Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=759e87fbd1e68c290a7221620636ede8425d6a870aa0240f18d726b6c8e6b832, cn=Prashant Pundlik Wagh
Date: 2019.05.16 12:33:17 +05'30'

(प्रशान्त पुं. वाघ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८) आदिवासी विकास विभाग, कार्यासन -६, मंत्रालय, मुंबई.
९) सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती, विसयो.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र.श्राबायो-२०१९/प्र.क्र.४६/विसयो, दिनांक : १४ मे, २०१९ सोबतचे सहपत्र.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता अनुदानाचे वितरण

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना २२३५ सी १७२

अनुसूचित जमाती लाभार्थी (रक्कम रुपयात)

अ.क्र.	जिल्हा	नियंत्रक अधिकारी क्रमांक	अनुसूचित जमाती लाभार्थी संख्या	एप्रिल, २०१९	मे, २०१९	जून, २०१९	जुलै, २०१९	या आदेशान्वये एकूण वितरीत रक्कम
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मुंबई शहर	N0028	१५	४८००	४८००	४८००	४८००	१९२००
२	मुंबईउपनगर	N0029	१७	५४४१	५४४१	५४४१	५४४१	२१७६४
३	ठाणे	N0036	१६२६	५२०४१६	५२०४१६	५२०४१६	५२०४१६	२०८१६६४
४	रायगड	N0012	२९७९	९५३४५६	९५३४५६	९५३४५६	९५३४५६	३८१३८२४
५	रत्नागिरी	N0023	२३१	७३९३३	७३९३३	७३९३३	७३९३३	२९५७३२
६	सिंधुदूर्ग	N0018	४७	१५०४२	१५०४२	१५०४२	१५०४२	६०१६८
७	पालघर	N0037	३०३२७	९७०६४३६	९७०६४३६	९७०६४३६	९७०६४३६	३८८२५७४४
	कोंकण विभाग		**३५२४२**	**११२७९५२४**	**११२७९५२४**	**११२७९५२४**	**११२७९५२४**	**४५११८०९६**
८	नाशिक	N0006	२८३३८	९०६९८३८	९०६९८३८	९०६९८३८	९०६९८३८	३६२७९३५२
९	धुळे	N0026	१४९२४	४७७६५६३	४७७६५६३	४७७६५६३	४७७६५६३	१९१०६२५२
१०	जळगाव	N0010	२०६१८	६५९८९८१	६५९८९८१	६५९८९८१	६५९८९८१	२६३९५९२४
११	अहमदनगर	N0030	२१४८	६८७४८७	६८७४८७	६८७४८७	६८७४८७	२७४९९४८
१२	नंदुरबार	N0027	४०३७९	१२९२३६७१	१२९२३६७१	१२९२३६७१	१२९२३६७१	५१६९४६८४
	नाशिक विभाग		**१०६४०७**	**३४०५६५४०**	**३४०५६५४०**	**३४०५६५४०**	**३४०५६५४०**	**१३६२२६१६०**
१३	पुणे	N0040	६६०	२११२३९	२११२३९	२११२३९	२११२३९	८४४९५६
१४	सोलापूर	N0019	१०३१	३२९९८१	३२९९८१	३२९९८१	३२९९८१	१३१९९२४
१५	सातारा	N0032	४६	१४७२२	१४७२२	१४७२२	१४७२२	५८८८८
१६	सांगली	N0008	३७	११८४२	११८४२	११८४२	११८४२	४७३६८
१७	कोल्हापूर	N0039	५०	१६००२	१६००२	१६००२	१६००२	६४००८
	पुणे विभाग		**१८२४**	**५८३७८६**	**५८३७८६**	**५८३७८६**	**५८३७८६**	**२३३५१४४**
१८	नागपूर	N0014	१७४८२	५५९५२७५	५५९५२७५	५५९५२७५	५५९५३४३	२२३८११६८
१९	वर्घा	N0025	११६३५	३७२३८८९	३७२३८८९	३७२३८८९	३७२३८८९	१४८९५५५६
२०	चंद्रपूर	N0021	२२०३८	७०५३४६५	७०५३४६५	७०५३४६५	७०५३४६५	२८२१३८६०
२१	भंडारा	N0033	६८१०	२१७९६०३	२१७९६०३	२१७९६०३	२१७९६०३	८७१८४१२
२२	गडचिरोली	N0013	१९८२८	६३४६१३४	६३४६१३४	६३४६१३४	६३४६१३४	२५३८४५३६
२३	गोंदिया	N0024	२९१२	९३२०१२	९३२०१२	९३२०१२	९३२०१२	३७२८०४८
	नागपूर विभाग		**८०७०५**	**२५८३०३७८**	**२५८३०३७८**	**२५८३०३७८**	**२५८३०४४६**	**१०३३२१५८०**
२४	अमरावती	N0011	१९५९२	६२७०६००	६२७०६००	६२७०६००	६२७०६००	२५०८२४००
२५	अकोला	N0041	३५३	११२९८०	११२९८०	११२९८०	११२९८०	४५१९२०
२६	यवतमाळ	N0007	१२२५७	३९२२९६५	३९२२९६५	३९२२९६५	३९२२९६५	१५६९१८६०
२७	बुलढाणा	N0038	३६०१	११५२५३३	११५२५३३	११५२५३३	११५२५३३	४६१०१३२
२८	वाशिम	N0022	५३००	१६९६३१३	१६९६३१३	१६९६३१३	१६९६३१३	६७८५२५२
	अमरावती विभाग		**४११०३**	**१३१५५३९१**	**१३१५५३९१**	**१३१५५३९१**	**१३१५५३९१**	**५२६२१५६४**
२९	औरगाबाद	N0035	५२२८	१६७३२६९	१६७३२६९	१६७३२६९	१६७३२६९	६६९३०७६
३०	बीड	N0034	२०४७	६५५१६१	६५५१६१	६५५१६१	६५५१६१	२६२०६४४
३१	नांदेड	N0031	७६३८	२४४४६१२	२४४४६१२	२४४४६१२	२४४४६१२	९७७८४४८
३२	परभणी	N0016	१०८६	३४७५८४	३४७५८४	३४७५८४	३४७५८४	१३९०३३६
३३	उस्मानाबाद	N0020	२६८	८५७७५	८५७७५	८५७७५	८५७७५	३४३१००
३४	जालना	N0015	४४७५	१४३२२६५	१४३२२६५	१४३२२६५	१४३२२६५	५७२९०६०
३५	लातूर	N0009	१७६१	५६३६२४	५६३६२४	५६३६२४	५६३६२४	२२५४४९६
३६	हिंगोली	N0017	२११०	६७५३२४	६७५३२४	६७५३२४	६७५३२४	२७०१२९६
	औरंगाबाद विभाग		**२४६१३**	**७८७७६१४**	**७८७७६१४**	**७८७७६१४**	**७८७७६१४**	**३१५१०४५६**
	एकूण		**२८९८९४**	**९२७८३२३३**	**९२७८३२३३**	**९२७८३२३३**	**९२७८३३०१**	**३७११३३०००**